MHCH070008942026

**सं. फौ. ख. क्र.६८१/२०२६**

**सरकार –वि.– ज्ञानेद्रा राही**

नि.क्र.०४

<u>**श्रीमती ए. आर. देवरे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र.२), भद्रावती यांचे न्यायालय.**</u>

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | : | दि. ११/०४/२०२६ |
| २. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | दि. ११/०४/२०२६ |
| ३. फिर्यादराचे नाव व त्याचे निवासस्थान इत्यादी | : | महाराष्ट्र शासन, मार्फत पोलिस स्टेशन अधिकारी, पोलिस स्टेशन, माजरी. |
| ४. आरोपीचे नाव, त्याच्या आई व बापाचे नाव, त्याचे वय व त्याचे निवासस्थान इत्यादी | : | **ज्ञानेद्रा विजय कुमार राही**, वयः ३५ वर्ष, व्यवसाय – मजूरी, रा. आंबेडकर वार्ड क्र. ४, भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. |

५. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला या अपराधाचा तपशील –

तुम्ही दि.११/०४/२०२६ रोजी १२.१५ ते १२.४० वाजेच्या दरम्यान आंबेडकर शाळा चर्च जवळ, आंबेडकर वार्ड, माजरी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेवून हारजीतीचा सट्टापट्टीचा जुगाराचा खेळ खेळवित असतांना मिळून आला व अशाप्रकारे तुम्ही कलम १२(अ) महाराष्ट्र प्रतिबंधक जुगार कायद्यान्वये गुन्हा केला आणि तो माझ्या दखलेत आहे.

Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.04 17:54:15 +0530

दिनांकः ०४/०८/२०२६

(ए. आर. देवरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), भद्रावती.

आरोपातील मजकुर आरोपीला मातृभाषेत समजावून सांगण्यात आला. त्याची जबानी वेगळी नोंदविण्यात आली.

Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.04 17:54:25 +0530

दिनांकः ०४/०८/२०२६                    (ए. आर. देवरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), भद्रावती.

**आरोपीचे प्रतिकथनः**

प्रश्न क्र.१ – तुम्हाला आरोप पत्राच्या नकला मिळाल्यात काय ?
उत्तर – होय.

प्रश्न क्र.२ – तुम्हाला आता मातृभाषेत समजावून सांगण्यात आलेला अपराधाचा तपशील समजला काय ?
उत्तर – होय.

प्रश्न क्र.३ – तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर – होय.

\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-\-
(आरोपीची सही)

Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.04 17:54:31 +0530

दिनांकः ०४/०८/२०२६                    (ए. आर. देवरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), भद्रावती.

**कारणमिमांसा**

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुलीची पुरसिस नि.क्र.०३ वर दाखल करुन स्वेच्छेने गुन्हा कबुल केला आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केला असल्यामुळे त्याला कलम १२(अ) महाराष्ट्र प्रतिबंधक जुगार कायद्यान्वये दोषी ठरविण्यात येते.

शिक्षेच्या मुद्दयावर आरोपीचे कथन ऐकले. त्याच्या म्हणण्यानुसार तो त्याचे घरचा एकटा कमावता ईसम आहे. त्याचा हा पहीलाच गुन्हा आहे. त्याच्यावर त्याचे घरचे लोक अवलंबुन आहे.

त्यामुळे त्याच्या वर नरमाई दाखविण्यात यावी. आरोपीचे कथन लक्षात घेता व त्याचा हा पहीलाच गुन्हा असल्याचे दिसून येत असल्याने खालीलप्रमाणे आदेश देणे न्यायोचित होईल. परिणामतः मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. आरोपी **ज्ञानेद्रा विजय कुमार राही**, यास फौ.प्र.संहिता कलम २५२(१) नुसार कलम १२(अ) महाराष्ट्र प्रतिबंधक जुगार कायद्यान्वये दोषी ठरविण्यात आले आहे.

२. आरोपीने कोर्ट उठेपर्यंतची शिक्षा भोगावी. तसेच आरोपीने रक्कम रु.३००/– (अक्षरी रु. तीनशे फक्त) दंड भरावा व दंड न भरल्यास ०५ दिवसांच्या साध्या कारावासाची शिक्षा भोगावी.

३. जप्त मुद्देमाल – ०१ काळ्या रंगाची पेन व बोगस आकडे लिहीलेल्या कागदी चिट्या, उपयोगशुन्य असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. जप्त मुद्देमाल – जप्त रक्कम रु.७००/– (रुपये सातशे फक्त) अपिल कालावधीनंतर सरकार खात्यात जमा करावी.

Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.04 17:54:38 +0530

दिनांकः ०४/०८/२०२६

(ए. आर. देवरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२), भद्रावती.

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघूलेखकाचे नाव | : | जी. डी. किटे, |
| न्यायालयाचे नाव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.२) भद्रावती. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०४/०८/२०२६ |